# उपविभागीय अधिकारी कार्यालय
## माजलगांव, जि.बीड

☎ दुरध्वनीक्र.(02443) 299182 Email ID- sdomajalgaon@gmail.com


जा.क्र.2026/उविअ/एमएजी/पो.पा.भ./मुलाखत/कावी दिनांक:04.03.2026

**प्रति,**

**एम.टेक मल्टीसर्व्हीसेस छत्रपती संभाजीनगर**

**विषय :- माजलगाव उपविभाग पोलीस पाटील पदभरती 2026**
**दि. 07.03.2026 रोजी नियोजित मुलाखत पुढे ढकलून दि.11.03.2026 रोजी सकाळी 10.00 ते सायंकाळी 06.00 वाजेपर्यंत आयोजित करणेबाबत.**

**संदर्भ :-**

1. शासन निर्णय क्रमांक बीव्हीपी 0611/प्र.क्र.419/पोल-8 दि.23 ऑगस्ट 2011
2. या कार्यालयाची जाहीरात दि. 16.01.2026
3. मा. जिल्हादंडाधिकारी बीड यांचे पत्र क्र. 2026/आरबी-डेस्क/पोल-1/पोलीस पाटील/कावी दि.24.2.2026
4. या कार्यालयाचे पत्र क्र.2026/उविअ/एमएजी/पो.पा.भ/मुलाखत/कावी दि.28.02.2026

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, उपविभाग माजलगाव अंतर्गत रिक्त असलेल्या पोलीस पाटील पदभरती—2026 च्या अनुषंगाने दि. 22.02.2026 रोजी लेखी परीक्षा घेण्यात आलेली असून, सदर परीक्षेत पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या मुलाखतीचे वेळापत्रक निश्चित करण्यात आलेले आहे.

तथापि, दि. 07.03.2026 रोजी आयोजित करण्यात आलेली मुलाखत प्रशासकीय कारणास्तव पुढे ढकलण्यात येत आहे. त्या अनुषंगाने, दि. 07.03.2026 रोजी होणारी मुलाखत आता दि. 11.03.2026 रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालय, माजलगाव येथे सकाळी 10.00 ते सायंकाळी 06.00 वाजेपर्यंत घेण्यात येणार आहेत. त्याअनुषंगाने सोबत जोडलेल्या वेळापत्रानुसार संबंधित पात्र उमेदवार यांना त्यांच्या लॉगिनवर मुलाखतीचा दिनांक, वेळ, कळविण्यात यावे तसेच मुलाखतीस येताना ऑनलाईन प्रणालीवर अ‍ॅपलोड केलेले सर्व कागदपत्राच्या मुळ प्रती, व त्याची एक सत्यप्रत सादर करणे बाबत सुचना देण्यात यावे.

तसेच सर्व संबंधित उमेदवारांना सूचित करण्यात यावे की, मुलाखतीस उपस्थित राहताना ऑनलाईन प्रणालीवर अपलोड केलेल्या सर्व कागदपत्रांच्या मुळ प्रती तसेच त्यांची एक स्वाक्षरीत सत्यप्रत सोबत आणणे बंधनकारक राहील. आवश्यक कागदपत्रे सादर न केल्यास मुलाखतीस अपात्र ठरविण्यात येऊ शकते, याची नोंद घ्यावी.

तसेच मुलाखतीस येताना 1) उमेदवारांचे उच्चतम शैक्षणिक पात्रतेसह 10 वी पासुन ते पुढील शिक्षणाची सर्व यादी 2) उमेदवार हा पोलीस पाटील यांचा वारस असल्यास त्याबाबतचा पुरावा 3) गृह रक्षक दल (होम गार्ड) मध्ये जाहीरात निघाल्यापासुन 1095 दिवस (03 वर्ष) कार्यरत असल्याचा पुरावा राष्ट्रीय छात्र सेना (एनसीसी) क्र

उपविभागीय अधिकारी कार्यालय
माजलगांव, जि.बीड
☎ दुरध्वनीक्र.(02443) 299182 Email ID- sdomajalgaon@gmail.com


प्रमाणपत्र/दोन्ही चा पुरावा सादर करावा 4. अतिरिक्त अभ्यासक्रम व उपक्रमामधील प्रमाणपत्र असल्यास मुळ प्रती (extra curricular activities) सादर करावे

सदरील मुलाखत पात्र उमेदवारांची यादी, वेळापत्रक https://beedpp.recruitonline.in या संकेतस्थळावर आजच प्रसिध्द करण्यात यावी.

**(गौरव सा.इंगोले)**
उपविभागीय दंडाधिकारी,तथा अध्यक्ष पोलीस
पाटील पदभरती प्रक्रिया समिती- माजलगाव
उपविभाग 2026

**प्रत :-**

1. मा. जिल्हादंडाधिकारी बीड यांना माहितीस्तव सविनय सादर.
2. मा. अपर जिल्हाधिकारी अंबाजोगाई यांना माहितीस्तव सविनय सादर
3. जिल्हा सुचना व विज्ञान अधिकारी यांना देण्यात येवुन कळविण्यात येते की, मुलाखत पात्र उमेदवारांच्या वेळापत्रकाची यादी https://beed.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.